Kindly attend Shri. Swapnil Kalwadkar Sir.

जा.क्र./जिसव / / 2013
जिल्हा सरकारी वकील कार्यालय,
परभणी
दिनांक : 15 / 02 /2013.

प्रति,
कार्यासन अधिकारी,
सह सचिव,
विधी व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई.– 400 032.

विषय :– नागरीकांची सनद प्रसिध्द प्रसिध्द करणे हा विषय सन 2012–13 साठीच्या KRA मध्ये प्रसिध्द करणे बाबत.
संदर्भ :– आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.के.आर.ए. 2012 /प्र.क्र.10/का.07 दिनांक : 17/01/2013.

आदरणीय महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयास अनुसरुन सविनयपुर्वक सादर करण्यात येते की,जिल्हा सरकारी वकील कार्यालय, परभणी यांच्या कार्यालयाच्या कामकाजाबाबतची नागरिकांची सनद तयार करुन प्रसिध्द करण्यात आली आहे व त्याची प्रत व माहिती सि. डी. (PDF) स्वरुपात वेबसाईटवर प्रसिध्द करणेकामी आपले कार्यालयास पाठविण्यात येत आहे.

तरी नागरिकांची सनद व माहिती सि.डी. स्वरुपात स्विकृत करण्यात यावी हि विनंती.

आपला विश्वासु,

( विजयराव देशमुख )
जिल्हा सरकारी वकील,परभणी

# जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय, परभणी.

## नागरिकांची सनद

**प्रस्तावना :**

जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय हे परभणी, हिंगोली, वसमत व गंगाखेड येथे शासनाचे वतीने काम पाहणा–या सरकारी वकीलांचे मुख्य कार्यालय आहे. जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता, परभणी हे या कार्यालयाचे प्रमुख असतात व सर्व सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता हे त्यांच्या अधिपत्याखाली आपले कामकाज करत असतात.

**दिवाणी व फौजदारी प्रकरणांत सरकारी वकीलांचे पदनाम :**

दिवाणी प्रकरणांत प्रमुख सरकारी वकीलांना **'जिल्हा सरकारी वकील'** हे पदनाम आहे. तसेच दिवाणी प्रकरणांत इतर सरकारी वकीलांना **'सहायक सरकारी वकील'** हे पदनाम आहे.

फौजदारी प्रकरणांत प्रमुख सरकारी वकीलांना **'सरकारी अभियोक्ता'** हे पदनाम आहे. तसेच फौजदारी प्रकरणांत इतर सरकारी वकीलांना **'अतिरीक्त सरकारी अभियोक्ता'** हे पदनाम आहे.

**जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता व सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांची नेमणुक :**

जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता व सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांची नियुक्ती शासनाचे वतीने जिल्हा न्यायालयातील दिवाणी व फौजदारी प्रकरणे चालविणेसाठी तसेच

दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर या न्यायालयातील दिवाणी प्रकरणे चालविण्यासाठी करण्यात येते.

दिवाणी प्रकरणांत जिल्हा सरकारी वकील व सहायक सरकारी वकीलांची नेमणुक दिवाणी प्रकीया संहिताचे ऑर्डर 27 रूल 8–बी तसेच महाराष्ट्र विधी अधिकारी नियम 1984 चे नियम 13 अन्वये विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून होत असते.प्रमाणे करण्यात येते.

तसेच फौजदारी प्रकरणांत सरकारी अभियोक्ता व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांची नेमणुक ही फौजदारी प्रकिया संहिता चे कलम 24 नुसार तसेच महाराष्ट्र विधी अधिकारी नियम 1984 चे नियम 13 अन्वये विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून होत असते.

**<u>जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय परभणी यांचे अधिपत्याखालील कार्यालये :</u>**

जिल्हा सरकारी वकील कार्यालय, परभणी यांचे अधिपत्याखाली खालील कार्यालये आहेत :

1. सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कार्यालय, हिंगोली
2. सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कार्यालय, वसमत
3. सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कार्यालय, गंगाखेड

वरिल कार्यालयांत सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता हे जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता यांचे अधिपत्याखाली आपले कामकाज पहात असतात.

**<u>सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांची संख्या :</u>**

जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय, परभणी यांचे अधिपत्याखाली एकुण 09 सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता नेमणुकीस आहेत त्यापैकी परभणी येथे 4, हिंगोली येथे 1, गंगाखेड येथे 2 व वसमत येथे 2.

**<u>जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय व सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कार्यालयांत चालणारे न्यायीक कामकाज :</u>**

<u>फौजदारी विभागातील कामकाज :–</u> फौजदारी विभागात खालील फौजदारी प्रकरणांचे कामकाज चालते

1. सत्र खटले (भारतीय दंड विधान, 1960 चे कलमां खालील प्रकरणे).

2. विशेष खटले (अनुसूचीत जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे कलमां खालील प्रकरणे, लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याचे कलमाखालील प्रकरणे, गुंगीकारक औषध कायद्याचे कलमाखालील प्रकरणे, भारतीय विद्युत कायद्याचे कलमां खालील प्रकरणे) व इतर फौजदारी प्रकरणे.

3. फौजदारी अपीले

4. फौजदारी पुर्नरिक्षण अर्ज

5. जामीन अर्ज

फौजदारी विभागात वरिल प्रकरणात जिल्हा सरकारी वकील हे स्वतः व सहायक सरकारी वकीलांची नेमणुक करत असतात.

<u>फौजदारी प्रकरणात अपील / रिव्हीजन :</u> फौजदारी प्रकरणात जर माननीय न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता केली असेल व सदरील

प्रकरणात माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे अपील करण्याजोगे मुद्दे नसतील तर संबंधीत सरकारी वकील महाराष्ट्र विधी अधिकारी नियम चे नियम 49 अन्वये आरोपींचे निर्दोष सुटण्याची कारणे देवून त्याचा अहवाल माननीय जिल्हादंडाधिकारी यांचेकडे निकालाचे प्रमाणीत प्रत व पि.पी.ओ. फाईलसहित पाठवित असतो व त्याची एक प्रत सह सचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद व एक प्रत जिल्हा पोलीस अधिक्षक यांना देण्यात येते.

प्रकरणात जर माननीय न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता केली असेल व सदरील प्रकरणात माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे अपील करण्याजोगे मुद्दे असतील तर, संबंधीत सरकारी वकील एक अपील प्रस्ताव तयार करून व प्रकरणाची सर्व प्रमाणीत कागदपत्रे जोडून तो प्रस्ताव मा. सह सचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद यांचेकडे माननीय उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अपील/रिव्हिजन करणेकामी पाठवित असतात. सदरील अपील प्रस्तावाची एक प्रत मा.जिल्हादंडाधिकारी व एक प्रत मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांना देण्यात येते.

**जमानती प्रकरण विभागातील कामकाज :–** जमानती प्रकरणातील विभागात जमानत अर्ज माननीय न्यायालयात दाखल झाल्यावर त्याची नोटीस व अर्जाची प्रत या कार्यालयास माननीय न्यायालयाकडून प्राप्त होत असते. त्यानंतर संबंधीत सरकारी वकील त्या प्रकरणात हजर होतात. त्यानंतर बिनतारी संदेश करून संबंधीत पोलीस ठाण्याकडून त्यांचा अहवाल व तपासाची कागदपत्रे मागविण्यात येतात व शासनाकडून लेखी म्हणणे दाखल करून संबंधीत सरकारी वकील शेवटीला त्यात युक्तीवाद करित असतात.

**जमानती प्रकरणात रिव्हीजन :** जमीन अर्जामध्ये आरोपीचा जामीन रद्द करण्यासाठी गंभिर प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रव्हिजन दाखल करणेकामी मा.सह सचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद येथे रिव्हिजन प्रस्ताव पाठविण्यात येत असतात.

**दिवाणी विभागातील कामकाज :–** दिवाणी विभागात संबंधीत शासनाच्या विभागाकडून मा.न्यायालयाची नोटीस व दाव्याची प्रत या कार्यालयास प्राप्त झाल्यावर संबंधीत सरकारी वकील त्या दाव्यात हजर होत असतो व त्यानंतर

संबंधीत शासनाच्या विभागाकडून परिच्छेद निहाय उत्तरे मागविण्यात येतात व त्याआधारावर संबंधीत सरकारी वकील लेखी उत्तरपत्र तयार करून विधी व न्याय विभागाकडून मंजूरी घेवून न्यायालयात दाखल करण्यात येते. नंतर लेखी व तोंडी पूरावा सादर करून प्रकरणाचे शेवटी संबंधीत सरकारी वकील त्याप्रकरणात युक्तीवाद करीत असतो.

<u>दिवाणी प्रकरणात अपील / रिव्हीजन</u> : दिवाणी प्रकरणात जर माननीय न्यायालयाने जर शासनाचे विरोधात न्यायनिवाडा दिला असेल व सदरील प्रकरणात जिल्हा न्यायालयात तसेच उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे अपील करण्याजोगे मुद्दे नसतील तर संबंधीत सरकारी वकील महाराष्ट्र विधी अधिकारी नियम, 1984 चे नियम 35 अन्वये न्यायनिवाडा शासनाचे विरोधात जाण्याची कारणे देवून त्याचा अहवाल माननीय जिल्हादंडाधिकारी व संबंधीत शासनाचे विभागाकडे निकालाचे प्रमाणीत प्रतसहित पाठवित असतो व त्याची एक प्रत सह सचिव, विधी व न्याय विभाग, औरंगाबाद यांना देण्यात येते.

दिवाणी प्रकरणात जर माननीय न्यायालयाने जर शासनाचे विरोधात न्यायनिवाडा दिला असेल व सदरील प्रकरणात वरिष्ठ न्यायालयामध्ये अपील करण्याजोगे मुद्दे असतील तर संबंधीत सरकारी वकील त्यामध्ये एक अपील मेमो तयार करून तो सह सचीव विधी व न्यायविभागाकडे पाठविण्यात येतो व त्यांचे सुचनेप्रमाणे अपीलाची पूढील कार्यवाही करण्यात येते.

भुसंपादन <u>विभागातील कामकाज</u> :–

भुसंपादन विभागात संबंधीत शासनाच्या विभागाकडून मा. न्यायालयाची नोटीस व दाव्याची प्रत या कार्यालयास प्राप्त झाल्यावर संबंधीत सरकारी वकील त्या दाव्यात हजर होत असतो व त्यानंतर संबंधीत शासनाच्या विभागाकडून परिच्छेद निहाय उत्तरे मागविण्यात येतात व त्याआधारावर संबंधीत सरकारी वकील लेखी निवेदन तयार करून न्यायालयात दाखल करण्यात येते नंतर लेखी व तोंडी साक्ष पुराव्या नंतर प्रकरणाचे शेवटी संबंधीत सरकारी वकील त्याप्रकरणात युक्तीवाद करतात.

<u>भुसंपादन प्रकरणात अपील / रिव्हीजन</u> : भुसंपादन प्रकरणात जर माननीय न्यायालयाने जर शासनाचे विरोधात न्यायनिवाडा दिला असेल तर त्याबाबत सह सचीव, विधी व न्याय विभाग यांचे कडे अपील प्रस्ताव पाठविण्यात येतो.

**सरकारी वकील यांचे अधिकार, नेमणुका, सेवाशर्थी, कर्तव्ये, मानधन :**

जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता आणि सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांचे अधिकार, नेमणुका, सेवाशर्थी, कर्तव्य व मानधन महाराष्ट्र विधी अधिकारी नियम, 1984 नुसार केल्या जातात.

जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता आणि सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांचे कार्यालयीन कामकाज The Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984 नुसार चालते.

**जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालयातील अभिलेखे :**

जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय, परभणी येथील अंतीमतः निकाली काढण्यात आलेली दिवाणी/फौजदारी प्रकरणे, विवरणपत्रे व इतर अभिलेख हे शासनाच्या विधी व न्याय विभागाचे कामकाज चालविण्याचे नियम 1984 च्या नियम 123 प्रमाणे 1 ते 3 वर्षानंतर नष्ट करण्यात येतात.

**जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय, परभणी व सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कार्यालयांतील कर्मचा–यांची नेमणूक व संख्या**

जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय, परभणी व सहायक सराकरी वकील तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कार्यालये यांचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे यासाठी कर्मचारी वर्ग नेमण्यात आलेला आहे. सदरील कर्मचारी वर्ग हा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी यांचे अस्थापनेवरील नियुक्ती करण्यात आलेला आहेत.

([illegible]राव देशमुख)
सरकारी वकील, परभणी

# विवरणपत्र – 1
## नागरीकांची सनद (Citizen Charter)

| कार्यालयाचे नाव | जनतेस देण्यात येणा–या सेवा (स्तर नमुद करावा) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे. | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिका–याचे नाव नमुद करावे.) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारित असल्यास विहित / सर्वसाधारण) | अपील असल्यास प्राधिकारी आणि अपील करण्याचा विहित कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तकार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय, परभणी. | 1. जनतेकडून माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अर्जांना उत्तरे | 1. सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जावर रू. 10/– चे कोर्ट फी स्टॅम्प तिकिट लावावे. | 1. विभागात पदनिर्देशित केलेले संबंधीत माहिती अधिकारी. – वरिष्ठ लिपीक, जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता कार्यालय, परभणी. | 1. माहिती अधिका–याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 30 दिवस सहायक अधिका–यांकडे परस्पर अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 35 दिवस | 1. अपीलीय अधिका–याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 30 दिवस. उत्तर मिळाल्यानंतर 90 दिवसांत मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे. | |
| | 2. जनतेकडून माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अपीलांना उत्तरे. | 2. सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जावर रू. 20/– चे कोर्ट फी स्टॅम्प तिकिट लावावे. | 2. नियुक्त केलेले संबंधीत अपिलीय प्राधिकारी – जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता, परभणी. | 2. अपिलीय प्राधिका–याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 30 दिवस | | |
| | 3 कार्यालयातील कामकाजाच्या विलंबास प्रतिबंध करण्याबाबत शासनाने लागू केलेल्या अधिनियम,2005 नुसार प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढणे. | ...... | जिल्हा सरकारी वकील तथा सरकारी अभियोक्ता, परभणी. | 3. सर्वसाधारण 45 दिवस. | ...... | ...... |